KTSPM's

**HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA, RAJGURUNAGAR**

**National Service Scheme**

**A.Y. 2022-23**

# Poshan Mah Activity

# B-017 & BSF-084

## Wild vegetable and fruit Exhibition

| Sr. No | Item | Particulars |
|---|---|---|
| 1 | Date | 23rd and 24th September 2022 |
| 2 | Name of Event | Wild vegetables and fruit exhibition |
| 3 | Venue | HRM |
| 4 | Time | 10.00 am to 6.00 pm |
| 5 | Duration of the programme | Two day |
| 6 | Number of participants | 350 |
| 7 | In Collaboration with | Panchayat Samiti Khed |

**Report**

A two day wild vegetable exhibition was organized on 23rd and 24th September 2022 under Poshan Mah in association with National Service Scheme unit of Hutatma Rajguru Mahavidyalaya and Maharashtra State Rural livelihood mission Panchayat Samiti Khed. The exhibition was inaugurated at 11.00 am by the hands of Chairman of Khed Taluka Shikshan Prasarak Mandal, Hon. Adv. Devendraji Buttepatil in the presence of Police Inspector Mr. Satishkumar Gurav, Pratapraoji Takalkar (Vice-Chairman, KTSPM), Balasaheb Sandbhor (Member, KTSPM), Dr. Shirish S. Pingale (Principal), Dr. V.D. Kulkarni (Vice-Principal of Science faculty), Dr. S. D. Shinde (Vice-Principal of Arts faculty), Mr. K.R. Pacharne (Registrar), Taluka campaign manager Mrs. Latika Bhalerao, Mr, Shivaji Telange and Mr. Satish Ghanwat.

In this exhibition stalls of products and wild vegetables produced by self-help women's groups of villages Bhorgiri, Bhomale, Tokawde, Nayphad, Shirgaon, Moroshi, Dehne, Kharpud were set up. The wild vegetables on display included Kurdu, Chaitacha bar, Gourai, Kobal, Chichurdi, Ran-alu, Tondi, Bhangri, Pathri, Kelphul, Shewga, Mokha, Bharangi, Katemath, Kusra, Kulu, Til,Kuda, Pen,Khadak ambadi, Gulwel, Phandbahji. In addition to this, rice varieties were also displayed like Indrayani rice, Ambemohar, Rajbhog. NSS volunteers prepared charts depicting the nutritious contents of the displayed items and explained about the uses and method of preparation.

Students, teachers and non-teaching staff of the college visited this wild vegetable festival and enjoyed food and other products. The Chairman, KTSP Mandal, Hon. Adv, Devendraji

Buttepatil said that “In human life, only if there is integrity in diet and practice along with ethical thoughts, our mental and also body health remains healthy”. He also expressed the opinion that there is no alternative to organic farming as the result of the large increase in the use of chemical fertilizers is seen in the transmission of various diseases to humans. Principal Dr. Shirish Pingle said that there is a need for an activity like Wild Vegetable exhibition to make the students understand about the rare wild vegetables which are completely organic, nutritious and medicinal in the hills of Sahyadri in the rural areas. Dr. Ganesh Dhumal, NSS program officer, introduced the program, Dr. Prabhakar Jagtap, anchored, and Dr. Kirti Nitanware gave the vote of thanks.

**लोकमत**

जीवनात आहार आणि व्यवहार शुद्ध असणे आवश्यक : बुट्टेपाटील

# राजगुरू महाविद्यालयात रानभाज्या महोत्सवाचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर :** माणसाच्या जीवनात आचार-विचारांबरोबर आहार आणि व्यवहार शुद्ध असेल तरच शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते. पूर्णत: सेंद्रिय, पौष्टिक आणि औषधी असलेल्या रानभाज्यांविषयीचे परंपरागत ज्ञान विद्यार्थ्यांनी अवगत करून घेणे गरजेचे असून, त्यासाठी रानभाज्या महोत्सवांसारख्या उपक्रमांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान पंचायत समिती खेडच्या वतीने पोषण माह अंतर्गत आयोजित दोन दिवसीय रानभाज्या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी पोलीस निरीक्षक सतीशकुमार गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे, तालुका अभियान व्यवस्थापक लतिका भालेराव, शिवाजी तेलंगे, सुरेश घनवट उपस्थित होते.

या प्रदर्शनात भोरगिरी (भिवेगाव), भोमाळे (पाभे), टोकावडे, नायफड, शिरगाव, मोरोशी, डेहणे, खरपूड या गावांतील स्वयंसहायता बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तू व रानभाज्यांचे स्टॉल लावले. त्यामध्ये कुरडू, चैताचा बार, गौराई, कोबल, चिचुरड, रानआळू, तोंडी, भांगरी, पाथरी, केळफूल, शेवगा, मोखा, भारंगी, काटे- माठ, कुसरा, कुळू अशा रानभाज्यांचा समावेश होता.



राजगुरू महाविद्यालयात रानभाज्या महोत्सवाचे उद्घाटन करताना पोलीस निरीक्षक सतीशकुमार गुरव, संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील.

महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी या रानभाज्या महोत्सवास भेट देऊन त्यांचा आस्वाद घेतला. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. गणेश धुमाळ यांनी, सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर जगताप यांनी केले तर आभार डॉ. कीर्ती नितनवरे यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 6 Sep 25, 2022
Powered by: erelego.com

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA RAJGURU NAGAR

Dr. S. S. Pingale
**PRINCIPAL**
Hutatma Rajguru Mahavidyalaya
(Arts, Science & Commerce)
Rajgurunagar.

पुढारी

# आहार, व्यवहार शुद्ध असणे आवश्यक

## ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांचे मत; राजगुरू महाविद्यालयात रानभाज्या महोत्सव

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

जीवनात आचार-विचारांबरोबर आहार आणि व्यवहार शुद्ध असले तरच शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते. पूर्णतः सेंद्रिय, पौष्टिक आणि औषधी असलेल्या रानभाज्यांविषयीचे परंपरागत ज्ञान विद्यार्थ्यांनी अवगत करून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी रानभाज्या महोत्सवांसारख्या उपक्रमांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे-पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान पंचायत समिती खेड यांच्या वतीने आयोजित दोनदिवसीय रानभाज्या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी पोलिस निरीक्षक सतीशकुमार गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे, तालुका अभियान व्यवस्थापक लतिका भालेराव आदी उपस्थित होते.



राजगुरू महाविद्यालयात रानभाज्या महोत्सवाचे उद्घाटन करताना पोलिस निरीक्षक सतीशकुमार गुरव, संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील.

या प्रदर्शनात भोरगिरी (भिवेगाव), भोमाळे (पाभे), टोकावडे, नायफड, शिरगाव, मोरोशी, डेहणे, खरपूड या गावांतील स्वयंसहायता बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तू व रानभाज्यांचे स्टॉल लावले. त्यामध्ये कुरडू, चैताचा बार, गौराई, कोबल, चिचुरड, रानआळू, तोंडी, भांगरी, पाथरी, केळफूल, शेवगा, मोखा, भारंगी, काटे- माठ, कुसरा, कुळू अशा रानभाज्यांचा समावेश होता.

प्रास्ताविक डॉ. गणेश धुमाळ यांनी, तर सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर जगताप यांनी केले. आभार डॉ. कीर्ती नितनवरे यांनी मानले.

My Gramin Edition
Sep 25, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA RAJGURU NAGAR

Dr. S. S. Pingale
**PRINCIPAL**
Hutatma Rajguru Mahavidyalaya
(Arts, Science & Commerce)
Rajgurunagar.



# सुदृढतेसाठी आहार, व्यवहार शुद्ध असावेत

**ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील : राजगुरूनगर येथे रानभाज्या महोत्सव**

राजगुरूनगर, दि. २३ (प्रतिनिधी) - माणसाच्या जीवनात आचार-विचारांबरोबर आहार आणि व्यवहार शुद्ध असले तरच शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते. पूर्णतः सेंद्रिय, पौष्टिक आणि औषधी असलेल्या रानभाज्यांविषयीचे परंपरागत ज्ञान विद्यार्थ्यांनी अवगत करून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी रानभाज्या महोत्सव यांसारख्या उपक्रमांची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

राजगुरुनगर : रानभाज्याची माहिती आणि आस्वाद घेताना विद्यार्थी.

राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान पंचायत समिती खेड यांच्या वतीने पोषण माह अंतर्गत आयोजित दोन दिवसीय रानभाज्या महोत्सवाच्या उद्घाटन ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक सतीश गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे, तालुका अभियान व्यवस्थापक लतिका भालेराव यांच्यासह ग्रामसंघाच्या (बचत गट) महिला, विद्यार्थी उपस्थित होते.

**या रानभाज्यांचा समावेश**

या प्रदर्शनात मोरोशी, भोरगिरी, भिवेगाव, भोमाळे, पाभे, टोकावडे, नायफड, शिरगाव, डेहणे, खरपूड या गावांतील स्वयंसहायता बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तू व रानभाज्यांचे स्टॉल लावले. त्यामध्ये कुरडू, चैताचा बार, गौराई, कोबल, चिचुरड, रानआळू, तोंडी, भांगरी, पाथरी, केळफूल, शेवगा, मोखा, भारंगी, कांटे- माठ, कुसरा, कुळू, तेरा, भोकरे आदी रानभाज्यांचा समावेश होता.

उपस्थितांनी या रानभाज्या महोत्सवास भेट देऊन त्यांचा आस्वाद घेतला. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. गणेश धुमाळ यांनी, सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर जगताप यांनी तर डॉ. कीर्ती नितनवरे यांनी आभार मानले.

News published in Pudhari








Dr. S. S. Pingale
**PRINCIPAL**
Hutatma Rajguru Mahavidyalaya
(Arts, Science & Commerce)
Rajgurunagar.










Dr. S. S. Pingale
**PRINCIPAL**
Hutatma Rajguru Mahavidyalaya
(Arts, Science & Commerce)
Rajgurunagar.